<u>नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२३</u>
<u>निशाणी क्र. ५१ लगत.</u>

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उर्वरीत सरतपास त्यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. साखरे यांच्यामार्फत शपथेवर पुढे सुरू –</u>

**१०.** आम्ही सदर प्रकरणात गट क्र. ४५, ४६, ४७/१, १४५, १४६/१ चे ७/१२ उतारा दाखल केले आहेत. ते सर्व दस्तऐवज सार्वजनिक दस्तऐवजाच्या प्रती असल्याने त्यास पुढील **निशाणी क्र. ५२ ते ५६** देण्यात येते. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीकडून करून घेतलेल्या विना मोबदला हक्क सोडपत्राचा दस्त दाखल केला आहे. त्यास **निशाणी क्र. ५७** देण्यात येते. सदर दस्ताची सूची क्र. २ ची प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ५८** देण्यात येते. तसेच वादींनी मे. तहसिलदार, बारामती, गावकामगार तलाठी, गोजुबावी, मंडल अधिकारी, उंडवडी क.प. यांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जाची प्रती दाखल केल्या आहेत. त्या अ.क्र. **निशाणी क्र. ५९ ते ६१** देण्यात येते. तक्रारी अर्ज पाठविलेल्या पोस्टाच्या पावत्या दाखल केल्या आहेत. त्यास **निशाणी क्र. ६२** देण्यात येते. वादीने मा. अप्पर पोलिस अधिक्षक, बारामती, पोलिस अधिक्षक, पुणे ग्रामीण, उपविभागीय पोलिस अधिकारी, बारामती, पो. नि. बारामती शहर पोलिस स्टेशन, यांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यास **निशाणी क्र. ६३ ते ६६** देण्यात येते. त्या संदर्भात पाठविलेल्या तक्रार अर्जाच्या पोस्टाच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. त्यास **निशाणी क्र. ६७** देण्यात येते. वादीचे व माझे आधार कार्ड दाखल केले आहे. त्यास **निशाणी क्र. ६८ व ६९** देण्यात येते. तसेच वादीने माझ्या नावे करून दिलेले कुलमुखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यावर वादीची व माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ७०** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. १, ३ व ४, तसेच प्रतिवादी क्र. २, ५ व ६ यांचा व त्यांचेतर्फे वकीलांचा वादीतर्फे साक्षीदार क्र. १ च्या उलटतपासाकरीता वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर राहिले. सबब, साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

जबाब माझेसमोर नोंदवला.

Digitally signed by PATIL PRITAMKUMAR MAHAVIR
Date: 2025.10.30 17:31:27 +0530

( प्रि. म. पाटील )
५ वे सह. दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
बारामती.

दिनांकः ३०/१०/२०२५